अटी व शर्ती :-

१) विषयांकित जागेच्या अभिन्यासाला या कार्यालयाचे आदेश पत्र क्र.प्रस्तु/ जिल्हाधिकारी/कावि-१६६९, १६७०/२००६, रा.मा.क्र. ६५०, १०२१/एन.ए.पी-३४/२००५-२००६, दिनांक ०५ सप्टेंबर, २००६ अन्वये **निवासी** वापरास अकृषिक परवानगी प्रदान करण्यात आली असून या अभिन्यासातील भुखंडावर करण्यात येणाऱ्या बांधकामास या आदेशातील अटी व शर्ती बंधनकारक राहील.

२) या बांधकाम परवान्याची मुदत आदेश प्राप्त झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाची आहे. या कालावधीत बांधकाम पूर्ण न झाल्यास मुदत संपण्यापूर्वी या प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्यात यावे. नुतनीकरण प्रत्येक वर्षाची मुदत संपण्यापूर्वी मुदतवाढ घेवून तीन वर्षा पर्यंत मंजूर करता येईल.

३) बांधकाम सुरु करण्यात येत असल्याबाबतची सुचना **सहा. संचालक, नगररचना विभाग, नागपूर** यांचे कार्यालयास विहीत नमुन्यात (**Appendix "F" मध्ये**) देण्यात यावी.

४) जोत्या पर्यंत (**Plinth Level**) बांधकाम पुर्ण झाल्यानंतर याबाबतची माहिती विहीत नमुन्या (**Appendix "G" मध्ये**) **सहा. संचालक, नगर रचना, नागपूर** यांचे कार्यालयास देण्यात यावी. याप्रमाणे सदर कामास नगर रचना कार्यालयाने विहीत नमुन्यात (**Appendix "H" मध्ये**) प्रमाणित केल्यानंतर पुढील काम सुरु करण्यात यावे.

५) उपयोगिता प्रमाणपत्र **सहा. संचालक, नगर रचना विभाग, नागपूर** (**Occupancy Certificate**) यांचे मंजूरी शिवाय नविन ईमारत किंवा ईमारतीचा कोणताही हिस्स्याचा उपभोग करण्यास किंवा उपभोग करण्याची मंजुरी कोणत्याही व्यक्तीला वापर करण्याचा परवाना देता येणार नाही. तसे केल्यास अनधिकृत उपभोग केल्याबाबत अर्जदार आणि वास्तुशास्त्रज्ञ (आर्किटेक्ट) हे गुन्हयास पात्र ठरतील. उपयोगीता प्रमाणपत्राकरीता ईमारत मालक व वास्तुशास्त्रज्ञ (आर्किटेक्ट) यांनी (**Appendix "J मध्ये**) बांधकाम पूर्ण झाल्याच्या नकाशाच्या तीन प्रतीसह अर्ज **सहा. संचालक, नगर रचना विभाग, नागपूर** यांचेकडे सादर करावा.

६) मंजूर नकाशात दर्शविलेल्या वापराकरीताच ईमारतीचा उपयोग करण्यात यावा.

७) स्थलदर्शक नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नियोजीत बांधकामापासून पुढील, मागील व बाजूचे अंतरे प्रत्यक्षात जागेवर कायम ठेवणे आवश्यक असुन सदर जागा कायम खुली ठेवावी.

ह ना न
१६४८ / २०१०
९६ / ३८

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 HINGNA

८) नियोजीत ईमारतीसाठी आवश्यक असणाऱ्या पाण्याची सोय व सांडपाण्याची व मैला निर्मुलनाची व्यवस्था नसल्यास, प्रत्यक्ष वापरापूर्वी अर्जदाराने केली पाहिजे.

९) नियोजीत बांधकामातील मजल्यांची संख्या नकाशावर दर्शविल्याप्रमाणे असावी यापेक्षा जास्त असू नये.

१०) नियोजीत बांधकाम मंजूरीपेक्षा जास्त वेगळे बदल करावयाचे असल्यास किंवा वापर बदलावयाचा असल्यास पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

११) जिल्हाधिकारी, नागपूर यांची मंजूरी घेतल्याशिवाय मंजूर बांधकाम नकाशा विरुध्द बांधकाम करण्यात येवू नये. मंजूर बांधकाम नकाशाविरुध्द कोणतेही बांधकाम केल्यास ते अनधिकृत गृहीत धरण्यात येईल याची नोंद घ्यावी. अनधिकृत बांधकाम केल्यास **महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६** नुसार जमिन मालक / विकासकर्ता व वास्तुशास्त्रज्ञ (आर्किटेक्ट) गुन्हयास पात्र ठरतील.

१२) नागपूर महानगरपालिकेकरीता मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार आवश्यक संपूर्ण सॅनिटरी कार्य पूर्ण करण्यात यावे.

१३) सिव्हर लाईनला पावसाच्या पाण्याची पाईप लाईन जोडण्यात येवू नये आणि त्याकरीता विकासकर्त्याने स्वंतत्र व्यवस्था करावी.

१४) **जिल्हाधिकारी** किंवा त्यांचे प्रतिनिधी अथवा **नगर रचना अधिकारी** यांचे पडताळणी करीता ईमारत बांधकाम सुरु असतांना मंजूर बांधकाम नकाशा नेहमी बांधकामाचे ठिकाणी उपलब्ध ठेवावेत.

१५) नागपूर शहराकरीता लागू विकास नियंत्रण नियमावली संपूर्ण विकासकर्त्यास बंधनकारक राहतील.

१६) भुखंड पावसाच्या पाण्याचे जलसंवर्धन (**RAIN WATER HARVERSTING**) ची व्यवस्था विकासकर्त्यास करावी लागेल.

१७) भुखंडावरील रिकाम्या जागेत विकासकर्त्याने नियमावलीनुसार किमान आवश्यक झाडे लावावी व ती झाडे मोठी होईपर्यत त्यांचे संगोपन करावे.

१८) पाण्याची आणि सिव्हेज डिस्पोजलची व्यवस्था विकासकर्त्यांने स्वत: करावी लागेल.

१९) भुखंडाच्या कडेला योग्य आकाराच्या व रस्त्यापासून जवळ असेल अशा कचऱ्यांच्या टोपल्यांची व्यवस्था विकासकर्त्यास करावी लागेल.

२०) तळमजल्यावर योग्य पत्र पेटीची व्यवस्था करावी.

ह अ न
४६४/२०१०
१६/३८

SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR CLASS-2 HINGNA